# महापालिकेत मुदतवाढीचे राज्य

## सोळा विभागांत सेवानिवृत्त अधिकारी, काहींना तीन वेळा मुदतवाढ

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** महापालिकेत गेल्या काही वर्षांपासून नियमित भरतीची कोणतीही प्रक्रिया न झाल्याने मनपात मुदतवाढीचे राज्य सुरू असून, तब्बल १६ महत्त्वाच्या विभागांत सेवानिवृत्त व करारावर नियुक्त अधिकारी नेमण्यात आले आहे. यातील काही अधिकाऱ्यांना तीन वेळा मुदतवाढ मिळालेली असून, सरकारने स्पष्ट नियम जारी करूनही या अधिकाऱ्यांना प्रशासकीय व वित्तीय अधिकार देण्यात आले असल्याने शासनाच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याची चर्चा प्रशासनात चांगलीच रंगली आहे. यात तांत्रिक विभाग व विद्युत विभागातील प्रमाण अधिक असल्याचे सूत्रांनी सांगितले.

गेल्या सात ते आठ वर्षांपासून मनपामध्ये नियमित भरतीची प्रक्रिया ठप्प आहे. त्यामुळे सध्या १६ महत्त्वाच्या विभागांमध्ये सेवानिवृत्त व करारावर नियुक्त अधिकारी काम पाहत आहेत.

डिसेंबर २०१६ मधील शासन निर्णयात मुदतवाढीवरील किंवा करार पद्धतीने नियुक्त अधिकाऱ्यांना कोणतेही प्रशासकीय किंवा वित्तीय अधिकार देऊ नयेत, असे स्पष्टपणे नमूद आहे. तसेच नियुक्त प्राधिकाऱ्यांनी अशा अधिकाऱ्यांच्या कामाचा नियमित आढावा घ्यावा, असेही त्या आदेशात आहे. मात्र प्रत्यक्षात हा नियम धाब्यावर बसवून मनपा प्रशासनात मुदतवाढीचे राज्य सुरू असल्याची चर्चा आहे. यात तांत्रिक विभाग, विद्युत विभाग, पाणीपुरवठा, ड्रेनेज, अतिक्रमण, निविदा, कर, आरोग्य अशा महत्त्वाच्या विभागांमध्ये सेवानिवृत्त अधिकारीच निर्णय घेत असल्याचे चित्र मनपात स्पष्टपणे दिसत आहे. तांत्रिक विभागात सलग तीन वेळा मुदतवाढ घेणारे अधिकारीही कार्यरत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.




### खाम नदी प्रकल्पही निवृत्तांच्या भरोशावर

शहरातील महत्त्वाकांक्षी खाम नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठीही दोन निवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निधी, तांत्रिक मंजुरी आणि निविदा प्रक्रियेत या नियुक्त्यांमुळे विलंब होत असल्याची चर्चा आहे.

### प्रशासन आविर्भावातची कुजबूज

महापालिकेतील कार्यपद्धतीवर निवृत्त अधिकाऱ्यांचा प्रभाव वाढत चालल्याने नियमित सेवकांमध्ये असंतोष वाढला आहे. अनेक विभागांत ङ्कङ्कनिर्णय उशिरा होतातफ्फ, ङ्कङ्कफाईल्स प्रलंबित राहतातफ्फ अशा तक्रारीची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. या विभागांमध्ये अनुभवाच्या नावाखाली निवृत्त अधिकाऱ्यांची मर्जी मनपा प्रशासनाकडून राखली जात असल्याची कुजबूज आहे.

### सध्या मुदतवाढीवर कार्यरत अधिकारी

शहर अभियंता ए.बी. देशमुख, कार्यकारी अभियंता गंगाधर भांगे, उपअभियंता वसंत निकम, पाणीपुरवठा : एम.बी. काझी, एम.ए. फालक, अतिक्रमण विभाग : संजय सुरडकर, ड्रेनेज : अख्तर सिद्दीकी, निविदा : मो. समीउलहक पटेल, अशोक साळवे, विद्युत विभाग : रवींद्र जोशी, फारूक सिद्दीकी, कर विभागाचे उपायुक्त : गणपत जाधव, खाम नदी प्रकल्प : जयवंत कुलकर्णी, असद अससोद्दीन यांच्यासह आरोग्य विभागातही दोन सेवानिवृत्त अधिकारी कार्यरत आहेत.

### पारदर्शकता, कार्यक्षमतेवर टांगती तलवार

महापालिका ही नागरिकांना थेट सेवा पुरवणारी संस्था. अशा संस्थेतील महत्त्वाचे विभाग निवृत्त अधिकाऱ्यांच्या भरवशावर किती काळ चालणार? नियमित भरती कधी होणार? शासन नियमांचे पालन कसे होणार? या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत मनपा प्रशासनाची पारदर्शकता आणि कार्यक्षमता या दोन्हीवर प्रश्नचिन्हांची टांगती तलवार राहाणार आहे.

## कासोडा येथे शेतीच्या वादावरून पुतण्याने चुलत्याचे डोके फोडले

**वाळूज महानगर, पुढारी वृत्तसेवा :** माझ्या वाट्याची शेती मला वाटून द्या, असे म्हणत एकाने चुलत्याच्या डोक्यात वीट मारून त्यांना जखमी केल्याची घटना बुधवारी (दि.२६) कासोडा येथे घडली. याविषयी पोलिसांनी सांगितले की, कल्याण देवबोने ( रा. कासोडा ता. गंगापूर) हे बुधवारी सायंकाळी घरी असताना त्यांचा पुतण्या अनिल देवबोने हा हातात विटकर घेऊन त्यांच्या घरासमोर आला. व त्याने कल्याण यांना माझ्या वाट्याची शेती मला वाटून द्या, असे म्हणत वाद घातला. कल्याण यांनी त्यास मी तुला शेती वाटून दिली आहे, असे सांगितले. तेव्हा अनिल याने त्यांना मारहाण सुरू करून कल्याण यांच्या डोक्यात विटकर मारून त्यांना जखमी केले. कल्याण यांचा भाऊ कडू देवबोने हा मध्यस्थी करण्यासाठी आला असता अनिल याने त्याच्या हातावर वीट मारली. या प्रकरणी कल्याण देवबोने यांनी दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात अनिल देवबोने याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संक्षिप्त



पुण्यतिथीनिमित्त फुले यांच्या कार्याबद्दल माहिती देताना डॉ. दिव्या पाटील व उपस्थित महिला.

### आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानतर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानच्या वतीने शुक्रवारी (दि.२८) महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. अध्यक्ष डॉ. दिव्या पाटील व कमलबाई हिवराळे यांच्या हस्ते प्रतिमेस हार अर्पण करून सर्व महिलांनी आदरांजली वाहिली. याप्रसंगी सविता मिसाळ, रंजना मिसाळ, शारदा शिंदे, ज्योती हिवराळे, नीता हरावळे, वंदना हिवराळे, सुलोचना मोरे, मीना डबरे, कल्पना आठवले, शकुंतला खरात, जया भिवसने, वैशाली खरात व इतर मान्यवर महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमात डॉ. पाटील यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा थोडक्यात उल्लेख करत सांगितले की, महात्मा ज्योतिराव फुले हे समाजातील प्रत्येक वंचित, शोषित घटकांसाठी उभे राहिलेले एक महान समाजसुधारक होते. त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा उघडून स्त्रीशिक्षणाची वाट मोकळी केली. दलित, गरीब आणि मागासलेल्या घटकांच्या उन्नतीसाठी सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी न्याय, समता आणि बंधुत्वाचा संदेश दिला.




वार्षिक क्रीडा महोत्सवाला उपस्थित मान्यवरांसह शिक्षक, विद्यार्थी.

### सेंट झेविअर्स स्कूलचा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** संविधान दिनाचे औचित्य साधून सेंट झेविअर्स स्कूलचा वार्षिक क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात आणि उत्कृष्ट खिलाडू वृत्तीत मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक फादर डॉमिनिक ब्राह्मणे, व्यवस्थापक फादर संजय पारखे तसेच शाळेच्या क्रीडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावर्षीचा थीम स्पर्धेचे धाडस करा आणि जिंकण्याचा निर्धार ठेवा हा विद्यार्थ्यांना प्रत्येक स्पर्धेत उत्तम प्रदर्शन करण्याची प्रेरणा देणारा ठरला. विविध क्रीडा स्पर्धांसह आकर्षक क्रीडा प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले, ज्यातून विद्यार्थ्यांची कौशल्ये, शिस्त आणि क्रीडावृत्ती प्रभावीपणे दिसून आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फादर संजय रूपेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा अधिकारी विजय काकडे होते. तसेच शाळेच्या माजी विद्यार्थिनी दामिनी पथकाच्या साक्षी चंद्रे होत्या. संपूर्ण वार्षिक क्रीडा महोत्सव अत्यंत यशस्वी ठरला.

## वंचित आघाडी पश्चिमतर्फे जि. प., पं. स. निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती

**वाळूज महानगर, पुढारी वृत्तसेवा :** वंचित बहुजन आघाडी, औरंगाबाद पश्चिमच्या वतीने आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ संदर्भात चारही सर्कल व गणातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीचे रविवारी (दि.३०) बजाजनगर येथे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती छत्रपती संभाजीनगर पश्चिमचे जिल्हा महासचिव अंजन साळवे यांनी दिली आहे.

औरंगाबाद पश्चिम तालुक्यातील दौलताबाद गट-अनुसूचित जाती महिला (राखीव) दौलताबाद गण- सर्वसाधारण, तीसगाव गण- अनुसूचित जाती महिला (राखीव), वडगाव कोल्हाटी (उत्तर-पूर्व) गट - ओबीसी महिला, गण (उत्तर) - अनुसूचित जाती (राखीव),गण (पूर्व) - ओबीसी (राखीव), वडगाव कोल्हाटी (मध्य-पश्चिम) गट - सर्वसाधारण, गण (मध्य) - सर्वसाधारण महिला, गण (पश्चिम) - सर्वसाधारण, पंढरपूर गट - अनुसूचित जाती महिला (राखीव), पंढरपूर गण - अनुसूचित जाती महिला (राखीव), गेवराई ब्रुकबोंड गण - सर्वसाधारण या भागातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती जिल्हा अध्यक्ष रूपचंद गाडेकर, जिल्हा महासचिव अंजन साळवे, मंगेश निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत बजाजनगरातील गणेश विकास संस्थेच्या सभागृहात रविववार ३० नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपासून सुरुवात होणार आहे.

मुलाखतीसाठी येणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी परिचय पत्रक तयार करून सोबत आणणे आवश्यक असून, गट व गण याची स्पष्ट माहिती द्यावी. मुलाखत अर्ज भरून जमा करावा. पक्षाचा सभासद-आजीवन सदस्य नोंदणी करणे आवश्यक. मुलाखतीसाठी प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य आहे.

## वैष्णवी शर्माची राज्यस्तरीय योग स्पर्धेसाठी निवड

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** ज्ञानदा इंग्लिश स्कूलच्या वैष्णवी शर्मा (इयत्ता नववी) हिने डीएसओ आयोजित जिल्हास्तरीय योग स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. तिने कलात्मक एकल योग, पारंपरिक योग आणि कलात्मक जोडीयोग या तिन्ही प्रकारांत प्रथम पारितोषिक मिळवले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मार्गदर्शक, शिक्षक आणि पालक यांनी अभिमान व्यक्त केला आहे. संस्थेचे सचिव, मुख्याध्यापक म्हणाले, वैष्णवीने शिस्त, मेहनत, कौशल्याच्या जोरावर हा मान पटकावला आहे. तिचे यश इतर तरुण खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सातत्यपूर्ण प्रयत्न आणि शिस्त यामुळे असामान्य यश मिळू शकते, याची तिने उत्तम उदाहरण घालून दिले आहे.



## आम्ही भारताचे लोक सर्वांना जोडणारा दुवा

### राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. राजशेखर सोलापुरे यांचे प्रतिपादन

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य हे भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्य असून, उद्देशिकेतील आम्ही भारताचे लोक सुरुवातीचे हे तीन शब्द समग्र देशवासीयांना जोडणारा दुवा आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. राजशेखर सोलापुरे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात भारतीय संविधान दिनानिमित्त बुधवारी (दि.२६) कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रकुलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे, कुलसचिव डॉ प्रशांत अमृतकर, डॉ. कैलास अंभुरे यांची विचार मंचावर उपस्थिती होती. डॉ. सोलापुरे यांनी संविधानामुळे देशात एका अर्थाने क्रांतीची आणि सामाजिक परिवर्तनाची सुरुवात झाली. संविधानाविषयीची निष्ठा बाळगणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक आदींची उपस्थिती होती.



संविधान दिनानिमित्त डॉ. राजशेखर सोलापुरे यांचे विद्यापीठात व्याख्यान झाले.

### हक्क, कर्तव्याची जाणीव ठेवा : कुलगुरू

भारतीय संविधानाने आपल्या मूलभूत हक्क दिलेले आहेत. तसेच कर्तव्य बजावण्यासही सांगितले आहे . प्रत्येक नागरिकांनी आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव ठेवावी, असे अध्यक्षीय समारोपात कुलगुरू डॉ. विजय फुलारी म्हणाले. प्रस्ताविक कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर यांनी केले.डॉ. पुरुषोत्तम देशमुख यांनी सूत्रसंचालन तर कैलास अंभुरे यांनी आभार मानले.

## वाणिज्य वार्ता

### मूळव्याधचे वाढते रुग्ण, मेडिकव्हर सल्लागारांचा विलंबित उपचारांविरुद्ध इशारा

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** जिल्ह्यात मूळव्याध रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. जागतिक अंदाजानुसार, सर्व प्रौढांपैकी निम्म्या प्रौढांना त्यांच्या आयुष्यात किमान एकदा तरी मूळव्याध येऊ शकतात. बहुतेक रुग्ण महिने अस्वस्थता आणि रक्तस्राव झाल्यानंतरच आमच्याकडे येतात. तोपर्यंत स्थिती वाढलेली असते आणि उपचार अधिक गुंतागुंतीचे होतात, असे मेडिकव्हर रुग्णालयातील वरिष्ठ सर्जिकल सल्लागार डॉ. आनंद औटी म्हणाले. लवकरच हस्तक्षेप करून, अनेक प्रकरणे शस्त्रक्रियेशिवाय व्यवस्थापित केली जाऊ शकतात. आहारात बदल, फायबर सेवन, हायड्रेशन आणि बाह्यरुग्ण प्रक्रियांद्वारे वेळेवर निदान करणे ही गुरुकिल्ली आहे. स्व-उपचार किंवा लक्षणे लपवणे नाही. शहरी आणि अर्ध-शहरी भागात जीवनशैलीचे नमुने प्रमुख ट्रिगर म्हणून उदयास येत आहेत. कमी फायबरयुक्त आहार आणि अनियमित जेवण, दीर्घकालीन बद्धकोष्ठता, कामावर जास्त वेळ बसणे, अपुरे हायड्रेशन, शौचालयात बसताना दीर्घकाळ मोबाईलचा वापर, गुदाशयातील नसांवर वाढता दबाव, मुख्य चेतावणीच्या लक्षणांमध्ये हे समाविष्ट आहे, हालचाल करताना ताजे रक्त, गुदद्वाराजवळ वेदना, सूज किंवा खाज सुटणे, बसण्यात अडचण किंवा अपूर्ण बाहेर पडण्याची भावना.

कमीत कमी अस्वस्थतेच्या उद्देशाने जीवनशैली समुपदेशन, वैद्यकीय थेरपी, बँडिंग प्रक्रिया, लेसर आणि कमीत कमी आक्रमक शस्त्रक्रिया यासह रूढीवादी आणि प्रगत उपचार पर्याय दोन्ही देतात. वेळेवर हस्तक्षेप करून, बहुतेक रुग्ण दीर्घकालीन गुंतागुंतीशिवाय सामान्य जीवनात परत येऊ शकतात.



डॉ. आनंद औटी

## युवा महोत्सवात कलांचा झंकार

### विविध कलाप्रकारांत विद्यार्थ्यांची छाप : आज समारोप

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीच्या ३९ व्या सेंट्रल झोन युवा महोत्सवात शुक्रवारी (दि.२८) विविध कलाप्रकारांनी रंगत आणली. मूक अभिनय स्पर्धेत विद्यार्थ्यांनी केलेली प्रभावी मांडणी, मिमिक्री स्पर्धेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच रांगोळी स्पर्धेत खुललेला पारंपरिक लोककलांचा देखणा आविष्कार यामुळे महोत्सवाचे आकर्षण अधिक वाढले. शिल्पकलेतून विद्यार्थ्यांनी साकारलेल्या गणपती बाप्पाच्या प्रतिकृती विशेष लक्षवेधी ठरल्या.

दरम्यान, या उत्साहवर्धक महोत्सवाचा समारोप आज, शनिवार दि.२९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जेएनईसी लॉन्स, एमजीएम विद्यापीठ येथे अभिनेते उपेंद्र लिमये यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या कार्यक्रमास एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, एआययूच्या सहसचिव डॉ.ममता राणी अग्रवाल, एआययूचे अधिकारी डॉ.निर्मल जौरा, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत.

दरम्यान, महोत्सवात महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यांतील २३ विद्यापीठांमधून सुमारे १२०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला आहे. मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या सांस्कृतिक, कलात्मक आणि बौद्धिक स्पर्धांचा समारोप सोहळा आज उत्साहात पार पडणार असून, विजेत्या संघांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. युवा प्रतिभेला व्यासपीठ देणाऱ्या या महोत्सवाच्या समारोपासाठी विद्यार्थी, स्पर्धक तसेच नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.



मूक अभिनय स्पर्धेत प्रभावी मांडणी करताना विद्यार्थी.

## बजाजनगरात दत्त जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रम सुरू

**वाळूज महानगर, पुढारी वृत्तसेवा :** दत्त जयंतीनिमीत्त बजाजनगर येथील दत्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त २७ नोव्हेंबर रोजी मंदिरात गुरुचरित्र पारायणास प्रारंभ करण्यात आला आहे.

बजाजनगरच्या दत्त कॉलनीतील दत्त मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मंदिरात गुरुचरित्र पारायणास सुरुवात झाली असून, दत्त जयंतीनिमित्त ४ डिसेंबर रोजी पहाटे श्रीदत्तमूर्ती अभिषेक, आरती, महापूजा त्यानंतर १० वाजता बजाजनगरातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. दरम्यान, रक्तदान तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे. दुपारी १ वाजता दत्तकृपा महिला व गुरुदत्त भजनी मंडळाच्या वतीने संगीतमय भजनाचा कार्यक्रम त्यानंतर सायंकाळी ४ वाजता हभप अविनाश महाराज गरड (श्रीक्षेत्र आळंदी ) यांचे कीर्तन झाल्यानंतर महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता केली जाणार आहे. भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन एकता मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## परस्पर माल विक्री करून मॅनेजरने साडेदहा लाख हडपले

### परताप सिंग अँड सन्स कंपनीतील प्रकार

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** न्यू शांतीनिकेतन कॉलनीस्थित परताप सिंग अँण्ड सन्स या चारचाकी स्पेअर पार्ट वितरण करणाऱ्या कंपनीतील मॅनेजरने तब्बल १० लाख ७४ हजार ३३२ रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कंपनीच्या अंतर्गत तपासणीत उघड झालेल्या या गैरव्यवहारानंतर आरोपी राहुल रामराव तुपे (२५, रा. पुंडलिकनगर) याच्याविरुद्ध जवाहरनगर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कंपनीचे महाराष्ट्र प्रमुख विलास जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील पाच शाखांपैकी न्यू शांतीनिकेतन येथील शाखेची जबाबदारी तुपेकडे होती. २२ नोव्हेंबर रोजी संदीप काथार यांनी संबंधित शाखेची तपासणी केली असता, संगणकातील नोंद व प्रत्यक्ष स्टॉकमध्ये प्रचंड तफावत आढळली. यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार २४ नोव्हेंबर रोजी चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान तुपेने ग्राहकांना माल दिल्यानंतर त्यांच्या बिलांवरील रक्कम कंपनीकडे न जमा करता स्वतःच्या खात्यावर वळती केल्याचेही समोर आले. गंगापूर, धुळे, परतूर, बदनापूर आदी ठिकाणांतील ग्राहकांकडील रोख व ऑनलाईन देयकांमधून एकूण ७ लाख २ हजार ४३६ रुपये त्याने स्वतःकडेच ठेवले असल्याचे निष्पन्न झाले. फिर्यादी जाधव यांनी दिलेल्या तक्रारीत, तुपेने केलेला अपहार सध्या उघडकीस आलेल्या रकमेपेक्षा अधिक असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जवाहरनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद असून पुढील तपास उपनिरीक्षक मारुती खिल्लारे करत आहेत.

### नांदेड-परळी शाखांसाठीचा मालही गायब

रोख व्यवहारासोबतच तुपेने माल पुरवठ्यातही मोठा घोटाळा केल्याचा आरोप आहे. नांदेड व परळी येथील शाखांसाठी पाठवण्यात आलेला लाखो रुपयांचा स्पेअर पार्टसचा माल संबंधित शाखांपर्यंत न पोहोचवता तिसऱ्या ठिकाणी विकून ३ लाख ७१ हजार ८९६ रुपयांचा अपहार केल्याचे उघड झाले आहे.


## जाहीर प्रगटन

**जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
**(महसूल शाखा)**
मध्यवर्ती प्रशासकीय ईमारत, फाजलपुरा, छत्रपती संभाजीनगर.
जा.क्र. २०२५/मशाका-२/जमीन-२/गायरान/वर्ग-१/प्र.क्र.१३९
दिनांक : २४/११/२०२५

सर्व जनतेस जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. शांतीलाल संपत गायकवाड,** रा. जयहिंद नगरी पिसादेवी, ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) २०१९ अन्वये मौजे सहजतपूर, ता. छत्रपती संभाजीनगर, जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट क्र. २७ मधील क्षेत्र ०० हे. ४० आर शासकीय गायरान भोगवटार वर्ग-२ जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर जमिनीबाबत या कार्यालयाने नियमाप्रमाणे गायरान भोगवटादार वर्ग-२ जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणेस कोणताही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा काही आक्षेप/तक्रार/उजर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून कागदोपत्री पुराव्यासह **७ दिवसांचे आत** लेखी स्वरुपात असल्यास सादर करावा.

विहित मुदतीत आक्षेप/तक्रार/उजर इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे गायरान भोगवटादार वर्ग-२ जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणेस कुणाचाही आक्षेप/उजर नाही, असे समजण्यात येऊन सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात विहित मुदतीनंतर आलेले आक्षेप/तक्रार अर्ज इत्यादी विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**(जनार्दन विधाते)**
**निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.**


## जिल्ह्यातून दुमदुमला बालविवाह मुक्तीचा नाद

### १०० हॉटस्पॉट गावांमध्ये एकाचवेळी शपथ

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** बालविवाह निर्मूलनाच्या दिशेने जिल्हा प्रशासनाने चांगले पाऊल टाकत १०० हॉटस्पॉट गावांमध्ये एकाचवेळी बालविवाह मुक्तीची शपथ देऊन जनजागृतीला नवी चालना दिली. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली २७ नोव्हेंबर २०२४ रोजी सुरू करण्यात आलेल्या बालविवाह मुक्त भारत प्रकल्पाला आज एक वर्ष पूर्ण झाल्याच्या औचित्याने हा उपक्रम राबविण्यात आला. २०३० पर्यंत छत्रपती संभाजीनगर जिल्हा पूर्णपणे बालविवाहमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

ज्या गावांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे, अशा १०० गावांची निवड हॉटस्पॉट म्हणून करण्यात आली. या गावांमध्ये शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, शाळा सल्ला समिती, महिला बचत गट, तसेच अंगणवाडी सेविका-मदतनीस यांनी एकत्र येत सामूहिकरित्या शपथ घेतली. गावातील प्रत्येक स्तरावरून मिळालेल्या प्रतिसादामुळे ही मोहीम प्रभावी ठरत असल्याचे शाळांचे मुख्याध्यापक आणि ग्रामपंचायत प्रतिनिधींनी सांगितले. या उपक्रमासाठी जिल्हा परिषद आयसीडीएस, शिक्षण, पंचायत, आरोग्य व महिला-बालविकास विभागांना युनिसेफ व एसबीसी-३ यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षण विभागाचे ज्ञानेश्वर रोडगे, बाल संरक्षण अधिकारी महादेव डोंगरे, युनिसेफ/एसबीसी-३ चे जिल्हा प्रकल्प समन्वयक बाळकृष्ण साळुंके, पंचायत विभागाचे सहाय्यक सुरेश कापसे व विविध विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



बालविवाह निर्मूलनाची शपथ घेताना शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका आदी.

> या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे गावांमध्ये नक्कीच बदल घडणार असल्याचे चित्र दिसत आहे.
> - **यशवंत जगोरे,** उपसरपंच

> सर्व गावाला सामावून घेऊन ही प्रतिज्ञा घेण्यात आली आहे. या प्रतिज्ञेबाबतचा निरोप मुलांच्या पालकांपर्यंत सहजपणे पोहोचविण्यात आला आहे.
> - **लक्ष्मी देवकर,** अंगणवाडी

## रविवारी पदारोहण दिवसासह बिदाई समारोह

**छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा :** खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत, पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे आचार्य डॉ. प्रणामसागर महाराज यांच्या ऐतिहासिक चातुर्मासाचा समारोप होत असून, त्यानिमित्त ३० नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता हिराचंद कस्तुरचंद कासलीवाल प्रांगणातील आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव सभागृहात ६ वाजता आचार्य पदारोहण दिवस आणि बिदाई समारोह आयोजित करण्यात आला आहे. यावेळी नूतन वास्तूचे शुद्धीकरणही आचार्यश्रींच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी व सचिव प्रकाश अजमेरा यांनी दिली.


**महाराष्ट्र ग्रामीण बँक**
**MAHARASHTRA GRAMIN BANK**
शासकीय मालकीची शेड्यूल्ड बँक Scheduled Bank Owned by Government
मुख्य कार्यालय : प्लॉट नं. ४२, गट क्र. ३३ (भाग), गोलवाडी गाव, ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर- IV,सिडको, छ. संभाजीनगर - ४३१ १३६
क्षेत्रीय कार्यालय : छ. संभाजीनगर

**शुध्दिपत्रक** **ई-लिलाव व विक्री सूचना**

सर्व जनतेस आणि कर्जदार / जामीनदार यांना सूचित करण्यात येते की, दिनांक २६/११/२०२५ रोजी पुढारी छ. संभाजीनगर आवृत्तीमध्ये मध्ये ई-लिलाव व विक्री सूचना जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. **सदर जाहिरातीमध्ये अनामत रक्कम जमा करण्याचा दिनांक - २६/१२/२०२५ आणि लिलावाचा दिनांक - २७/१२/२०२५ ऐवजी अनामत रक्कम जमा करण्याचा दिनांक - २९/१२/२०२५ आणि लिलावाचा दिनांक - ३०/१२/२०२५** असा वाचावा. करीता हे शुध्दीपत्रक.

दिनांक : २९/११/२०२५
ठिकाण : छ. संभाजीनगर
प्राधिकृत अधिकारी / क्षेत्रीय व्यवस्थापक
महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्रीय कार्यालय : छ. संभाजीनगर